**प्रेसनोट दि. ०२.०३.२०२१**

**श्री. प्रशांत प्रकाश पाटील वय ३० वर्ष खाजगी इसम रा. शिरढोण, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली यांना ३००००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

तक्रारदार यांचा ड्रायव्हर ट्रॅक्टर व ट्रॉली रोडचे कामासाठी घेवुन जात असताना, सदरचा मोकळा ट्रॅक्टर ट्रॉलीसह देशींगचे मंडल अधीकारी यांनी पकडला होता. त्यावेळी मंडल अधीकारी यांनी तक्रारदार यांना सदरचा ट्रॅक्टर वाळू भरण्याकरीता घेवुन जात असल्याचे सांगुन मंडल अधीकारी यांनी तक्रारदार यांना ट्रॅक्टर व ट्रॉली ताब्यात घेवुन कारवाई करतो असे सांगीतले त्यावेळी प्रशांत पाटील खाजगी इसम यांनी मध्यस्थी करुन मंडल अधीकारी यांचेसाठी तक्रारदार यांचेकडे १ लाख २५ हजाराची लाचेची मागणी केली व त्यापैकी ८८ हजार रुपये प्रशांत पाटील खाजगी इसम यांनी तक्रारदार यांचेकडून स्विकारले. त्यानंतर मंडल अधीकारी यांनी सदर ट्रॅक्टर व ट्रॉली सोडून दिली. त्यानंतर प्रशांत पाटील खाजगी इसम यांनी तक्रारदार यांना उर्वरीत ३७ हजार रुपये आणून देण्यास सांगीतले असले बाबत दि.०१.०३.२०२१ रोजी तक्रारदार यांनी लाच मागणीची तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ०१.०३.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये प्रशांत पाटील खाजगी इसम यांनी ३७ हजार रुपयाची लाच मागणी करुन चर्चअंती ३० हजार रुपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.०२.०३.२०२१ रोजी मिरज पंढरपुर रोड वरील हॉटेल त्र्यंबक नाष्टा सेंटर येथे सापळा लावला असता श्री. प्रशांत प्रकाश पाटील वय ३० वर्ष खाजगी इसम रा. शिरढोण, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून ३०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने श्री. प्रशांत प्रकाश पाटील वय ३० वर्ष खाजगी इसम रा. शिरढोण, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली यांचे विरुध्द कवठेमहांकाळ पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्री सुहास नाडगौडा सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे सो पोलीस उप अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक, गुरुदत्त मोरे तसेच पोलीस अंमलदार पो.हे.सलीम मकानदार, पो.ना. प्रितम चौगुले, धनंजय खाडे, पोहेकॉ संजय संकपाळ, संजय कलकुटगी,पोकॉ अविनाश सागर, मपोना राधीका मोने व सीमा माने चालक पोना पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाइट – www.acbmaharashtra.gov.in

Scanned with CamScanner